ती० कै० वासुदेव वामनशास्त्री खरे यांच्या स्मरणार्थ
प्रसिद्ध केलेला--ग्रंथ चवथा.

---

# नाना फडनवीसांचें चरित

## [ सुधारलेली तिसरी आवृत्ति ]

हा ग्रंथ मूळ

कै० वासुदेव वामनशास्त्री खरे

यांनी लिहिला त्याची ही नवी आवृत्ति

यशवंत वासुदेवशास्त्री खरे मिरज

यांनी तयार करून प्रसिद्ध केली.

शके १८४९. ] [ सन १९२७.

किंमत एक रुपाया आठ आणे.
[ टपालखर्च निराळा पडेल. ]

श्रीमंत कैलासवासी
कॅप्टन सर परशुरामपंत भाऊसाहेब पटवर्धन,
के. सी. आय्. ई.



जमखिंडी संस्थानचे अधिपति.

श्रीमंत कैलासवासी

कॅप्टन् सर परशरामपंत

# भाऊसाहेब पटवर्धन

[ के. सी. आय् ई. ]

सरकार संस्थान जमखिंडी

यांच्या पुण्यस्मृतीला

हा ग्रंथ

अत्यंत नम्रतापूर्वक

आणि

भक्तिभावानें अर्पण केला आहे.

यशवंत वासुदेवशास्त्री खरे, मिरज.

# अनुक्रमणिका.


| | पृष्ठें. |
|---|---|
| प्रकरण पहिलें—कुलवृत्तांत. | १–७ |
| प्रकरण दुसरें—बाल्य व तारुण्याचा प्रारंभ. | ८–१९ |
| प्रकरण तिसरें—माधवराव बल्लाळ व नारायणराव यांच्या कारकीर्दी. | १९–२४ |
| प्रकरण चवथें—बारभाईचें कारस्थान व शिंदे होळकरांचे लपंडाव. | २४–३६ |
| प्रकरण पांचवें—इंग्रजांची पहिली मोहीम-पुरंदरचा तह. | ३७–४५ |
| प्रकरण सहावें—१ शिंदे होळकरांची समजूत. २ राज्यस्थिति. ३ हैदर व करवीरकर यांच्या स्वाऱ्या. ४ आपापसांत द्वेष. ५ किरकोळ बंडें, दंगे, फितूर वगैरे. | ४५–६६ |
| प्रकरण सातवें—मोरोबादादांचें कारस्थान. | ६७–८७ |
| प्रकरण आठवें—१ हैदरअल्लीच्या स्वाऱ्या. १ किरकोळ दंगे व बंडें. ३ दरबारची डळमळ. ४ इंग्रजांशीं लढाई–वडगांवचा तह. ५ सखारामबापूस कैद. ६ इंग्रजांशीं पुनः बिघाड–सालबाईचा तह. | ८७–११० |
| प्रकरण नववें—गंगाबाई व सवाई रावसाहेब पेशवे. | १११–११६ |
| प्रकरण दहावें—टिपूचें पारिपत्य. | ११७–१३५ |
| प्रकरण अकरावें—नाना व पाटीलबावा यांमध्यें स्पर्धा. | १३६–१५४ |
| प्रकरण बारावें—खर्ड्यांची स्वारी. | १५४–१६० |
| प्रकरण तेरावें—सवाई रावसाहेब यांचा मृत्यु. | १६१–१६६ |
| प्रकरण चौदावें—घोटाळा व तारांवळ. | १६७–१७७ |

| | |
|---|---|
| प्रकरण पंधरावें—महादचें कारस्थान. | १७८-१८९ |
| प्रकरण सोळावें—बाजीरावांची सुरवात व कैद. | १८९-२०७ |
| प्रकरण सतरावें—कारागृहवास व सुटका. | २०७-२१७ |
| प्रकरण अठरावें—संकीर्ण माहिती व चर्चा. | २१७-२४८ |
| प्रकरण एकोणीसावें—शेवटचे दिवस व मृत्यु. | २४९-२६६ |
| प्रकरण विसावें—पुरवणी. | २६६-२७१ |
| महत्वाच्या व्यक्ति व स्थळें यांची सूची. | २७२-२८० |
| चित्रें— | |
| नाना फडनवीस. | १७ |
| नानांचें हस्ताक्षर. | ६५ |
| हरीपंत फडक्यांचें हस्ताक्षर. | १४५ |

# प्रस्तावना.

आपल्या देशांत नाना फडनवीस हा एक अद्वितीय मुत्सद्दी होऊन गेला. या देशांत मराठी ब्राम्हणांच्या शहाणपणाविषयीं जी कीर्ति गाजत आहे, तीस पुष्कळ अंशीं नाना फडनविसांचें नांवच कारणीभूत झालें आहे. आज सर्वत्र आबालवृद्धांच्या मुखीं जर त्यांचें नांव हरहमेशा निघत आहे, तर ते जिवंत असतां त्यांनीं स्वदेशीय जनांच्या हृदयमंदिरांत किती स्थळ व्यापिलें असावें! पण ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे कीं, नानांस मरून पुरतीं शंभर वर्षेंही लोटलीं नाहींत तोंच त्यांचा खऱ्या इतिहासाची ओळख लोक विसरले आहेत, आणि त्या इतिहासाच्या जागीं आतां नानांच्या कांहीं क्षुल्लक व खासगी संबंधाच्या खोट्यानाट्या गोष्टी मात्र सांगण्यांत येत असतात! लोकांस वाटतें कीं, नानांच्या गोष्टी व बिरबलाच्या गोष्टी या सारख्याच महत्वाच्या! बिरबलाच्या शहाणपणापेक्षां नानांचें शहाणपण अधिक किमतीचें होतें हें कोणाच्या स्वप्नींही येत नाहीं! जो तो नानांच्या चातुर्याची अतोनात तारीफ करीत असतो; पण जर कोणास प्रश्न केला कीं, तुम्ही नाना फडनवीस शहाणा म्हणतां तो कशावरून? तर कोणी साखरेच्या आंगठीची गोष्ट सांगेल, कोणी अनेक भाषा अस्खलित बोलणाऱ्या गुजराथ्याची गोष्ट सांगेल, कोणी एखादी कुजकीनासकी कोटी बिचाऱ्या नानांच्या बळेंच पदरीं बांधून स्वस्थ बसेल, आणि मनांत समजेल कीं, झालें, नाना फडनवीस हा कोणी अलौकिक बुद्धिमान पुरुष होता असें आपण निर्विवाद सिद्ध केलें! आपल्या लोकांत जे जुने माहितीगार गृहस्थ आहेत त्यांस जर 'बारभाईच्या कारस्थाना' बद्दल किंवा 'महाडच्या कारस्थानाबद्दल' त्रोटक त्रोटक माहिती विचारली तर ती त्यांस सांगता येईल कीं नाहीं याचा शकाच आहे।

वर लिहिलेला मजकूर जरी प्रायः जुन्या लोकांसच लागू पडणारा आहे, तथापि स्वदेशाच्या इतिहासाविषयीं अज्ञान व अनास्था हीं इंग्रजी

शिकून तयार झालेल्या नव्या मंडळींतही कमी आहेत असें नाहीं. या नव्या मंडळीस जर नानासंबंधें माहिती विचारली तर ती, तो विषयी होता, तो मत्सरी होता, तो लांच खात असे, त्याला अधिकाराची आशा अनावर होती, असल्याच तऱ्हेची मिळावयाची !

नाना फडनवीस हा कोणत्या योग्यतेचा मनुष्य होता, त्यानें काय काय कृत्यें केलीं, त्याच्या आयुष्यक्रमापासून आपणांस कांहीं घेण्यासारखें आहे कीं नाहीं, याविषयीं सर्व लोकांस माहिती मिळावी यासाठीं प्रस्तुत चरित्र लिहिण्याचा माझा प्रयत्न आहे. हा म्हणजे पूर्णपणें तडीस गेला आहे असें मी मुळींच समजत नाहीं. नाना फडनाविसांविषयीं अजून पुष्कळ माहिती मिळावयाजोगी आहे. पण ती मिळण्यास अनेक ठिकाणीं हिंडलें पाहिजे, जुनीं दप्तरें धुंडाळलीं पाहिजेत, व वर्षानुवर्ष स्वस्थपणानें शोध चालविला पाहिजे. तेव्हां असलें हें बिकट काम तडीस नेण्याचें यश मजपेक्षां अधिक उद्योगी अशा कोणातरी दुसऱ्या मनुष्याकरितां शिल्लक ठेवावें हें बरें, असें समजून मला स्वतःला जितकी माहिती मिळविली तितकी या चरित्राच्या रूपानें वाचकांस सादर केली आहे.

' काव्येतिहाससंग्रहां ' त जे ऐतिहासिक लेख प्रसिद्ध झालेले आहेत, त्यांपैकीं ज्यांचा ह्या पुस्तकास उपयोग होण्यासारखा होता त्याचा उपयोग करून घेतला आहे. मुंबईस रायल एशियाटिक सोसायटीच्या लायब्ररींत एक पेशव्यांची शकावलीसारखी बखर आहे, तिजमधूनही पुष्कळ माहिती घेतली आहे. ' काव्येतिहाससंग्रहां ' तील ' पंतप्रधानांची शकावली ' ही वरील शकावलीचा संक्षेप आहे, असें दिसतें. या बखरीस मी ' पंतप्रधानांची शकावली, मुंबई प्रत ' असें नांव दिलें आहे. पुण्यास पूर्वीं राजश्री पेंडसे नांवाचे गृहस्थ रहात होते. पेशवाईच्या इतिहासाची व दप्तराची यांजसारखी दुसऱ्या कोणासही माहिती नव्हती अशी आख्या आहे. सदर्हू गृहस्थांनीं जुन्या कागदपत्रांच्या आधारानें पेशव्यांची एक शकावली तयार केली आहे. या बखरींतून कांहीं कांहीं माहिती प्रस्तुत पुस्तकांत दिली आहे. या बखरीस मी ' पेंडशांचें टिपण ' असें नांव दिलें आहे.

नाना फडनवीस हे कारकुनी बाण्याचे व पराकाष्ठेचे व्यवस्थित गृहस्थ होते व त्यांच्या हातून उलाढालीही फार झाल्या. यावरून कोणी जर असें समजत असतील कीं, त्यांचे कागदपत्र त्यांच्या वंशजांजवळ पुष्कळ असतील तर ती त्यांची समजूत अगदीं चुकीची आहे. नानांच्या दप्तरावर आजपर्यंत जे प्रसंग गुजरले आहत ते ऐकले म्हणजे मराठी इतिहासाच्या भोक्त्यांस खेद झाल्यावांचून राहणार नाहीं. नानांचा मरणकाल जेव्हां समीप आला तेव्हां त्यांनीं आपल्या संपत्तीच्या व्यवस्थेबद्दल व गुप्त राजकारणांच्या संबंधाचे जे कागदपत्र आपणाजवळ होते ते जाळून टाकले. ते अशाकरितां कीं, आपणामागें आपल्या देणेदारांस व स्नेही व आश्रितमंडळीस बाजीरावाकडून कोणच्याही प्रकारें पीडा होऊं नये. नाना मरण पावल्यावर त्यांची सर्व जिनगी बाजीरावसाहेबांनीं जप्त केली. तेव्हां त्यांचें दप्तर बाळोजी कुंजर वगैरे लोकांच्या घरीं लोळत पडलें होतें ! पुढें या दप्तराचा जितका भाग हातीं लागला तितका बरोबर घेऊन नानांची पत्नी जिऊबाई ही पुण्याहून लोहगडास गेली व तेथून पनवेलीस गेली. तेथें सोळा वर्षें राहिल्यावर ती पुनः परत पुण्यास आली व शेवटीं मेणवलीस जाऊन राहिली. इतक्या धामधूमींत किती कागदपत्र गहाळ झाले असतील, व पोरांनीं लिहितां ऐवजीं वाचावयास घेऊन किती फाडून टाकिले असतील याचा अजमास लागत नाहीं ! नानांच्या दप्तरावर शेवटचा घाला इनाम कमिशनानें घातला. या दप्तराचें कोणीं फेरिस्त केलेलें नव्हतें व यांत काय आहे व काय नाहीं हेंही कोणास ठाऊक नव्हतें. असें सांगतात कीं, कमिशनानें नानांच्या दप्तराचे सुमारें शभर रुमाल राहिले होते ते जप्त करून नेले व त्यांपैकीं दहा पंधरा रुमाल काय ते परत आणून दिले ! कपतान कौपर यानें बाकीच्या रुमालांची काय विल्हेवाट केली असावी, हें थोडासा तर्क चालविला असतां कोणासही सहज करून येणारें आहे ! कमिशनच्या तडाक्यांतून जे कागद वांचले त्यांचीही नीटशी व्यवस्था राहिल्याचें दिसून येत नाहीं. कित्येक महत्वाच्या कागदांच्या नकला मात्र सांपडतात. अस्सल कागद कोणी उपटून नेले ते नेलेच ! उदाहरणार्थ नानांनीं जें आपलें थोडेंसें चरित्र लिहिलें आहे त्याची मूळ प्रत त्यांच्याच हातची पूर्वी

मेणवलीस होती. ती कोणी ब्रुक नांवाच्या इंग्रज कामदारानें विलायतेस नेली!

या पुस्तकाबरोबर जी नानांची तसवीर दिली आहे ती श्रीमंत रा० नानासाहेब फडनवीस यांच्या ताब्यांत असलेल्या अस्सल प्रतीवरून घेतली आहे. नमुन्यादाखल नानांच्या अक्षराचा फोटो दिला आहे. हें अक्षर जरी त्यांच्या उत्तम अक्षरापैकीं नव्हे, तरी लहानशी व सबंध मजकुराची दुसरी चिठी मिळेना, याकरितां हिचाच उपयोग करून घेणें भाग पडलें. या चिठीच्याच पाठीवर हरीपंत फडक्यांचें उत्तर आहे. त्याचाही फोटो पुस्तकांत दिला आहे.

या पुस्तकांत कालनिर्देश इंग्रजी रीतीनेंच करावयास पाहिजे होता, परंतु ज्या बखरींच्या व कागदपत्रांच्या आधारानें हा ग्रंथ लिहिला आहे, त्यांतून कालनिर्देश प्रायः मराठी व क्वचित् मुसलमानी रीतीनें केलेला असतो. याकरितां या पुस्तकांत सर्वत्र मराठी रीतीचाच स्वीकार केला आहे. क्वचित् इंग्रजी व मुसलमानी तारीख मात्र मिळाली तेथें प्रोफेसर बाळाजी प्रभाकर मोडक यांच्या जंत्रीवरून मराठी तिथि पाहून घातली आहे.

हा ग्रंथ तयार करण्याच्या कामीं मला ज्या उदार गृहस्थांनीं मदत दिली त्यांत अग्रस्थान श्री. रा. बाळासाहेब पटवर्धन मिरज संस्थानचे अधिपति, यांस देणें योग्य होय. या ग्रंथासाठीं श्रीमंतांनीं नाना फडनवीस व हरीपंत फडके यांच्या अक्षरांचे फोटो स्वतः घेऊन त्यांच्या सव्वा दोन हजार प्रती तयार केल्या! या कामीं श्रीमंतांस बराच खर्च आला व यातायातही फार पडली, पण ती त्यांनीं मोठ्या आनंदानें पतकरिली. कोणत्याहि सदुद्योगास सहाय्य करण्याच्या कामीं श्रीमंतांचा पाय नेहमीं पुढें असतो, व त्यास अनुसरूनच वर निर्दिष्ट केलेलें त्यांचें औदार्याचें कृत्य आहे, व त्या योगानें या ग्रंथास मोठें भूषण प्राप्त झालें आहे. श्री. रा. बापूसाहेब कुरुंदवाडकर व धि ऑनरेबल जव्हेरिलाल उमाशंकर याज्ञिक यांनीं पुष्कळ उपयुक्त सूचना केल्या व त्यांनीं रायल एशियाटिक सोसायटीच्या लायब्ररींतील बखर मिळवून दिली; रा. रा. सखाराम रामचंद्र जोशी, श्री. रा. मेणवलीकर यांचे कारकून, यांनीं मेणवलीच्या दप्तरांतील कागद-

पत्र दिले व जुनी माहिती गोळा करण्याच्या कामीं फार श्रम घेतले; रावसाहेब काशिनाथ नारायण साने यांनीं ' काव्येतिहास--संग्रहा ' तील पाहिजे त्या लेखांचा उपयोग करून घेण्याची कृपा करून परवानगी दिली, व रा. रा. हरि कृष्ण दामले यांनीं हें पुस्तक छापून प्रसिद्ध करण्याच्या कामी सर्व प्रकारची व्यवस्था केली. या सर्व गृहस्थांचा मी फारफार आभारी आहें.

मिरज, तारीख १ जुलै सन १८९२ } वासुदेव वामनशास्त्री खरे.

---

## दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

या पुस्तकाची पहिली आवृत्ती मीं तयार केली, त्यावेळीं डफ वगैरे इंग्रजांचे इतिहास, काव्येतिहास–संग्रहांतील वगैरे बखरी ' व मेणवलीच्या दप्तरांतील थोडीं पत्रें एवढ्यावरूनच ती तयार केली होती. परंतु पहिली आवृत्ति छापून झाल्यावर ऐतिहासिक लेख–संग्रहाकरितां मी पटवर्धन जहागीरदारांचीं दप्तरें चाळिलीं. त्यांतून नाना फडनवीसांच्या चरित्रास उपयोगीं पडणारी विश्वसनीय, मनोरंजक व बोधप्रद अशी आणखी पुष्कळ माहिती मिळाली आहे. परंतु तिजवरून नानांचें स्वतंत्र रीतीनें पुनः चरित्र लिहितां येण्याजोगें असूनही तें काम करण्यास ऐतिहासिक लेख-संग्रहाचे सर्व भाग छापून होतपर्यंत मला फुरसत मिळणें अशक्य झालें आहे. पहिली आवृत्ति खलास होऊन तर सात आठ वर्षें झालीं; वाचकांकडून पुस्तकाबद्दल मागण्या तर वारंवार येत असतात. याकरितां तूर्त पहिल्या आवृत्तींतील चुकांची दुरुस्ती करून ही दुसरी आवृत्ति छापविली आहे.

मिरज तारीख १८ सप्टेंबर सन १९०२ } वासुदेव वामनशास्त्री खरे.

---

# तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना.

या चरित्राच्या प्रती आज दहा पंधरा वर्षे विक्रीसाठीं शिल्लक नाहींत. ऐतिहासिक लेख संग्रहाच्या कामाच्या गर्दीमुळें या चरित्र लेखनाच्या उद्योगाकडे लक्ष देण्यास कै. तीर्थरूपांना कधींच सवड सांपडली नाहीं. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचें हें अपुरें काम पूर्ण करावें आणि हा ग्रंथ नवीन लिहून काढावा असें आम्ही ठरविलें. व हें काम गेल्या वर्षींच्या नोव्हें-बरांत हातीं घेतलें आणि आमच्या प्रयत्नाचें मूर्तस्वरूप—ही सुधारलेली तिसरी आवृत्ति—आजरोजीं वाचकांच्या हातीं देत आहों.

मूळ ग्रंथापैकीं प्रकरण पहिलें-कुलवृत्तांत, प्रकरण दुसरें—बाल्य व तारु-ण्याचा प्रारंभ, प्रकरण तिसरें-पानिपतची स्वारी, प्रकरण बारावें-गंगा-बाई व सवाई रावसाहेब पेशवे, प्रकरण सतरावें-राज्यकारभार, प्रकरण अठरावें--कांहीं खासगत गोष्टींविषयीं, हीं सहा प्रकरणें जागजागीं दुरुस्त करून आणि नवीन माहितीची भर घालून या आवृत्तींत होतां होईतों मूळस्वरूपांतच कायम ठेविलीं आहेत. बाकीचा सर्व मजकूर मुख्यत्वें अधिकारयोग आणि ऐ. ले. संग्रह या ग्रंथांच्या आधारानें तयार केला आहे. अधिकारयोग अथवा नानांस राज्याधिकार मिळाल्याचा इतिहास हा ग्रंथ कै. तीर्थरूपांनीं स. १९०८ सालीं लिहिला. हा ग्रंथ सर्वविश्रुत आहे. या ग्रंथांत स. १७७४ पासून स. १७७९ पर्यंतचें नानांचें चरित्र साग्र आणि तपशीलवार वर्णिलेलें असून तदनुषंगानें त्यांत सखारामबापू, महादजी शिंदे, तुकोजी होळकर, हरीपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन वगैरे मुत्सद्दी व सरदार यांचे अनेकविध हर्षामर्षाचे प्रसंग आणि त्या योगानें त्यांच्या होत गेलेल्या हालचाली यांचाही अतिशय मार्मिक प्रपंच केला आहे. सर्वच माहिती अत्यंत मनोवेधक असून ती नाना व त्यांचे समकालीन शत्रुमित्र यांच्या चरित्रावर अपूर्व प्रकाश पाडणारी आहे. या आवृत्तीपैकीं प्रकरण तीन ते नऊपर्यंत पांच प्रकरणें आम्ही या अधिकार-योगाच्या आधारानें तयार केलीं आहेत आणि शक्य तेथें मुळांतील मज-कूर जसाचा तसाच शब्दशः कायम ठेविला आहे. बाकीचा मजकूर ऐ.

ले. संग्रहांतील पत्रें व प्रस्तावना यांच्या आधारानें आम्ही तयार केला आहे. सारांश, या आवृत्तीच्या संपादनाचें अव्वल दर्जाचें काम कै. तीर्थरूपांनीं आगाऊच करून ठेविलें होतें आणि दुय्यम दर्जाचें काम मात्र आम्ही केलें आहे. पुस्तकाची भाषा व विषयाची मांडणी यांची जबाबदारी मात्र सर्वस्वीं आमचे शिरावर आहे.

नानांचे सर्व पराक्रम मंत्रसभेमधले असून ते बुद्धिवैभवाचे, वक्तृत्वाचे व कलमबहादुरीचे आहेत. समरांगणांतली अंगमेहनत, कौशल्य व तरवारबहादुरी यांचें या पुस्तकांत प्राधान्य नाहीं! तथापि कारस्थानें नीट समजावीं म्हणून तितक्या बेतापुरता नानांच्या कारकीर्दींतल्या सर्व मोहिमांचा तपशील आम्ही दिला आहेच. नानांच्या राजकारणाचा संबंध निजाम, भोसले, म्हैसूरकर आणि मुंबईकर इंग्रज या चार सरकारांशीं प्रामुख्यानें येतो. नानांच्या कारकीर्दींपैकीं स. १७७४ पासून पुढील सव्वीस वर्षें अत्यंत महत्वाचीं आहेत, पानिपत्तोतर मराठी इतिहासाबद्दल ऐ. ले. संग्रह हा एकच ग्रंथ प्रमाणभूत समजला जातो. सबब हें पुस्तक तयार करतांना आम्ही त्या ग्रंथाचाच मुख्यत्वें आधार घेतला आहे. पानिपतोत्तर कालासंबंधें ऐतिहासिक साधनांचे इतर ग्रंथही आतां बरेचसे छापून निघाले आहेत आणि त्यांतील माहितीचाही योग्य तो परामर्श आम्ही या पुस्तकांत काळजीपूर्वक आणि विस्तारपूर्वक घेतला आहे.

मूळ ग्रंथापैकीं प्रकरण अकरावें -नाना फडनवीसांचीं पत्रें हें प्रकरण स्थलाभावामुळें आम्ही या आवृत्तींत स्वतंत्र रीतीनें छापिलें नाहीं. या प्रकरणांत सुमारें बावीस तेवीस पत्रांचे उतारे दिले होते त्यापैकीं महत्वाचे उतारे आम्ही कायम ठेविले आहेतच आणि जीं पत्रें गाळलीं आहेत त्यांच्या जागीं त्यांपेक्षां ज्यास्त महत्वाचीं पत्रें या पुस्तकांत जागोजाग छापिलीं आहेत. अशीं पत्रें एका स्वतंत्र प्रकरणांत छापण्यापेक्षां त्यांचा समावेश विषयवारीनें त्या त्या प्रकरणांतून केला जाणें हेंच ज्यास्त सोईचें आहे असें आम्हांस वाटतें. शिवाय ऐ. ले. संग्रहांतील पत्रांचे उतारे या पुस्तकांत इतके भरपूर दिले गेले आहेत कीं, हें प्रकरण गाळल्याची उणीव वाचकांस बिलकूल भासणार नाहीं अशी आम्हांस उमेद वाटते.

' सर्वारंभास्तंडुलाः प्रस्थमूलाः ' । सुप्रसिद्ध बळवंत संगीत मंडळीनें तीनशें रुपयांची देणगी दिली म्हणूनच हा ग्रंथ इतक्या लवकर छापून बाहेर पडत आहे. बळवंत मंडळीचे मालक रा. चिंतामणराव कोल्हटकर आणि मास्टर दिनानाथ व कोल्हापुरे यांचा कै. तीर्थरूपांच्या ठिकाणीं पितृतुल्य आदर; त्यांच्या या वाङ्मयस्मारकाला हातभार लावावा याच निस्वार्थी व उदात्त हेतूनें प्रेरित होऊन त्यांनीं ही उदार देणगी दिली आहे आणि तीबद्दल आम्हांला त्यांचे सदैव ऋणीच राहिलें पाहिजे.

आमच्या इतर पुस्तकांप्रमाणें हें पुस्तक छापवितांनाही 'श्रीसिद्धेश्वर' प्रेसचे उत्साही मालक रा. रा. वासुदेव नारायण ठकार यांनीं आम्हांला अतिशय मदत केली आहे आणि त्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहों.

कै. तीर्थरूपांचा आत्मा या अल्पसेवेनें संतोष पावो.

मिरज, ता. २९<br>दिसंबर १९२७.

यशवंत वासुदेवशास्त्री खरे.

# महत्वाच्या व्यक्ति व स्थळें यांची सूची.


अदवानीकर नवाब-५४, ८८, १२४-१२७.

अनुपगीर गोसावी हिंमतबहादर-१४१-१४२,

अन्याबा अभ्यंकर-२१०.

अमृतराव पेशवे-११०, १६१, नाना तर्फे शिंद्यांविरुद्ध खटपट २००, २११-२१३, २४९, २५१, २६६-२६७

अलीबहादर-शिंद्यांशीं भयंकर वितुष्ट १३७-१४२.

असदअलीखान नि. निजाम-१५८-१५९.

अहिल्याबाई होळकर-४१, १४०, १४३, १५१.

अंबोजी इंगळे नि. शिंदे-१३९, १९६.

आनंदराव धुळप-११०.

आनंदीबाई पेशवे-२३, २७, ३५, बंडावा व कैद ४१, ४८, ११०, मृ. १६१.

आपाजीपंत गोंधळेकर-८६.

आपा बळवंत मेहेंदळे-६९, ७७.

आबा चिटणीस नि. शिंदे-१४९.

आबाजी कृष्ण शेलूकर-१९४, २०६, २०७, २१५, २३३.

इंग्रज-दादांना आश्रय देतात ३७, गुजराथेंत मोहीम ३८, ३९, पुरंदरचा तह व लपंडाव ४०-४४, ५९-६३, मोरोबाला सामील होतात ६८-८०, छत्तीस लाखांचें पचाड ८१, लोभीपणा व निराशा ८२-८३, मराठ्यांशीं पुनः बिघाड-वडगांवचा पराजय ८७-९४, मराठमंडळांत फूट पाडण्याचे प्रयत्न ९८, मराठ्यांशीं तिसरा बिघाड १०१-११०, नानाविरुद्ध निंद्य बातम्या पसरवितात १११-११३, मराठे व मोंगल यांस मिळवून घेऊन टिपूवर स्वारी करतात १२६-१३५, लष्कराची दुर्दशा १३१, १४४, नानातर्फे शिंद्यांस धमकी देतात १७९, पेशवाईवर वर्चस्वाचें खोगीर लादण्याचा प्रयत्न २५३-२५६, २६६-२६७, २६८-२७०.

इब्राहिमखान जाबीतजंग धोंसा नि. निजाम-५६-५८.

इस्माईलबेग हमदानी-१३८, १४१.

इसाभिय्या नि. निजाम-१८७

कचोबा पाळंदे-८६.

करवीरकर छत्रपति-४०, ४८ ५८, ५९, ७९, ८९, ९७, नानाकडून भाऊविरुद्ध चिथावणी १८२, २५९.

कल्याणदुर्गचा तह-२७.

कवडें हिंगणगांवची लढाई-५८.

कृष्णराव बळवंत काळे ४२, २३९.

काशीराव होळकर-१९७.

काळो बहिरव पेठे ११९-१२०.

कित्तूरकर देसाई ४८, ८९, ९७.
कोन्हेरराव पटवर्धन ५५.
खरगसिंग गारदी ९४.
खर्ड्यांची लढाई १५८-१५९.
खंडेराव दाभाडे सेनापती ४.
गणेशपंत बेहरे १०१-११०,१२०-१२७.
गुलजारखान ८९, १०२.
गुलाम कादर १३८.
गोपाळराव पटवर्धन २०.
गोपाळ नाईक तांबवेकर ७१, ८१, ८६.
गोपिकाबाई पेशवे १९.
गोविंदराव गायकवाड १६, ६५, ९८.
गोविंदराव काळे १५२, १५३, २०७, २३३, २३५, २५१.
गोविंदराव पिंगळे १९५, २०७, २१५, २३३.
गंगाधर गोविंद पटवर्धन १८२,२५२
गंगाधरपंत भानू मृ. २१०-- २११.
गंगाबाई पेशवे २५, २७, च्या नांवानें राज्यकारभार चालतो २८, ३१ मृ. १११.
घाशीराम कोतवाल १३२ -- १३४, १४८-- १४९.
चित्रदुर्गकर संस्थानिक ५६, ५७, ८८.
चिमाजी आपा पेशवे (दुसरे) ११०, १११, १६७-१७५.
चिंतोपंत लिमये १७६.
चिंतोपंत देशमुख २०९, २१०.
चिंतो विठ्ठल रायरीकर – फडणिशी २०, २५, ५१, ६८, ७१, ७३, ८५, ८९, कैद ९४.
छत्रपती सातारकर १४४, १४७, १७३, २११ – २१२.
जनार्दन बल्लाळ फडनवीस ६–८, मृ. १०.
जानोजी विश्वनाथ पेशवे १.
जिऊबादादा बक्षी नि. शिंदे १६७, १६८.
जिऊबाई फडनवीस २३१, २६८–२७०.
जोधपूरचा राजा १३८--१३९.
जंजिरेकर हबशी-- २, ३, १३१.
झाबिताखान रोहिला १३८.
टिपू सुलतान–वर मराठ्यांची पहिली स्वारी ११७ -- १२६, नरगुंदचा नाश करतो ११९--१२०, वर मराठे मोंगल व इंग्रज स्वारी करतात १२६ - १३५, मृ. २५३.
तुकोजी होळकर–पुणें दरबाराशीं लपंडाव २९–४५, पेशव्यांची भेट ४६, ५०, कारभाऱ्यांशीं रुसवा व दरबारी कामांत ढवळाढवळ ६५–६६, मोरोबाला सामील होतात ६८–८४, नानांशीं समेट ८५, इंग्रजांकडे फितूर होतात ८९–९४, १०१–११० टिपूवर पहिली स्वारी ११७– १२६,

शिंद्याच्या साह्याकरितां माळव्यांत जातात १३९. शिंद्याशीं भयंकर तेढ १४० -- १४३, शिंद्यांकडून नाश १५१, १८४, मृ. १९७, २४२-२४३.
तुळ्या पवार ९४.
त्रिंबकराव परचुरे २०५, २०७, २३३.
त्रिंबकराव पेठे पेशव्यांचे मुख्य कारभारी १९, २०, २७, मृ. २८.
त्रिंबकराव राजेबहाद्दर ६५.
दोतया ( सदाशिवराव भाऊ ) ४८.
बडावा कैद व मृ. ५२-५३.
दादा गद्रे १९४,१९७,२०७,२३३.
दामोदरराव हिंगणे १५--१६,२३३.
दाराजहां बहाद्दर नि. निजाम १३०-१३५.
दिल्लीचा बादशहा ११,१०८, १३७ १४२.
दुल्लमदास २५०,२६२.
देवराव हिंगणे १५१, २३५.
देवाजीपंत चोरघोडे ९९.
देवजी गवळी नि. शिंदे २११.
दौलतराव शिंदे १५७, नानाविरुद्ध बाजीरावास सामिल होतात १६८--१७५,बाळोबा व भाऊ यांच्या चिथावणीनें बाजीरावास कैद करून नानांशीं शत्रुत्व दाखवितात १७६-१७८, नानाशीं समेट १८०, नानांविरुद्ध बाजीरावाशीं गुप्त करार १८५-१८६, नानांचा द्रव्यापहार करतात १९१, निजाम व भोसले यांशीं कटकट १९२-१९६, नानांस विश्वासघातानें कैद करतात २०२--२०६, २०८, २०९--२१४, नानांस कैदेंतून सोडतात २१५, नानांचा पुनः द्रव्यापहार करतात २५०, घाटग्यास कैदेंतून सोडतात २६१, २६७.
धनाजी जाधवराव ३.
धारवाडचा वेढा १२९.
धोंडोपंत नित्सुरे १८२,१९४,१९५ २१५, २३३, २६७, २६९.
धोंडो रामचंद्र नि. शिंदे १८७,२६२ २६३.
नजीबखान वजीर १३७.
नरसिंगराव घायगुडे ७९,८६.
नरसो गोविंद ८९, ९६.
नाना ( बाळाजी जनार्दन )फडनवीस--कुलवृत्त १--६ जन्म ७, शिक्षण ८-९, पदाची वस्त्रें १०, पानिपतचे दुःखद अनुभव ११--१९, लोहगडावर छापा २०, पेशव्यांचे कारभारी २०--२४, बारभाईची उठावणी व अखत्यारीचा अधिकार २५--३६, इंग्रजांशीं युद्धें ३७--४५, शिंदे होळकरांत द्वैतभाव उत्पन्न करतात ४९, वर मारेकरी ५१, राज्याचा बंदोबस्त ४९-६०, कर्जपट्टी ५५, इंग्रजांशीं वैतुष्ट--कमाली कीं वसुली ! व्यापार बंदी व फ्रेंच वकिकात ५९-६२,

सखारामबापूशीं वितुष्ट- 'देवावें' चा तंटा ६३--६५, मोरोबाचा फितूर ६७--७०, पुरंदरास पलायन ७१, दूरदर्शी धोरण ७२–७५, मोरोबाच्या डोळ्यांत धूळफेंक ७५--८०, बंडाचा बीमोड ८१--८६, इंग्रजांशीं दुसरें युद्ध- वडगांवचा तह ८७--९४, दंगे. बंडें व दरबारची हळमळ ८८--९०, मुख्याधिकाराची प्राप्ति ९६, मराठ-मंडळाची जूट कायम ठेवतात ९८, शिंद्यांशीं धुसफुस ९९--१००, इंग्रजांच्या उचाटणाची प्रचंड तयारी १००--१०१, वर एक निंद्य आरोप १११--११३, टिपूचें पारिपत्य करतात ११७–१३०, नरगुंदचें लटपटींत धोरण ११९--१२०, इंग्रजांपासून टिपूचा बचाव करतात १३४--१३५, होळकरास लगामीं लावून घेतात १३६, दिल्लीच्या स्वारींत शिंद्यांस साह्य करतात १३७-१४२, शिंद्यांशीं स्पर्धा १४२--१५४, त्रागा १४६, शिंद्यांची दंडेली व चिंता १४६--१५२, शिंद्यांशीं समेट १५३--१५४, निजामाचें पारिपत्य करतात १५४--१६०, लोकांकडून निष्कारण निंदा १६१-१६४, सवाई माधवराव यांचा मृत्यु १६५–१६६, घोटाळा व तारांबळ दत्तकाची निष्फळ वाटाघाट, शिंदे व बाळोबा यांच्या उद्दाम कल्पना, बाजीरावाची कावेबाज लटपट, परशुरामभाऊंचे फितूर यामुळें साताऱ्यास पलायन आणि तेथून रायगडास पलायन १६७--१७७, महाडचें कारस्थान १७८--१८९, बाजीरावाशीं समेट १७९, शिंदे. निजाम, भोसले, इंग्रज यांस वश करून घेतात १८०--१८१, मशीराकडून बाळोबा व भाऊ यांच्या डोळ्यांत धूळफेंक १८२--१८३. कर. छत्रपति. बाबा फडके, नारोपंत चक्रदेव यांचेमार्फत फितूर व दंगे १८३-१८८. शिंद्याकडून भाऊ व बाळोबा यांचें पारिपत्य करवितात १८८, पुनः पुण्यास आगमन १९०, शिंदे व श्रीमंत यांशीं तेढ व शिंद्यांकडून द्रव्यापहार १९१--१९५, शिंद्याची दडेली व चिंता १९६--२०३, मुकीरामार्फत शिंद्यांशीं समेट व विश्वासघातानें कैद २०४-२०६, नगरास रवानगी २०८, कैदेंतून सुटका २१५, पुनः कारभार हातीं घेतात २१६--२१७, शरीरप्रकृति २१७, दिनचर्या २१८--२२०; स्वभाव २२०-२२४, द्रव्यसंग्रह २२४--२२७, धर्मकृत्यें २२८--२२९, कुटुंबसौख्य २३०–२३१, राज्यकारभार २३२–२४०, योग्यता २४१–२४२, राजकीय प्रतिस्पर्ध्यांशीं वागणूक २४३-२४५, राजकारण २४६--२४८, शेवटचे दिवस व मृत्यु २४९--२६५, शिंदे बा-

यांचा दंगा मोडतात २४९, शिंद्याक डून पुनः द्रव्यापहार २४९--२५०. भाऊंशीं पुनः सख्य २५२, इंग्रजांचा डाव फसवितात २५३--२५६, शिंद्यांकडून बाळोबातात्यांची मुक्तता करवितात २५७, बाळोबाशीं पुनः सख्य २५८, मृत्यु २६१-२६५.

नानासाहेब पेशवे-९, १७, मृ.१८.

नारायणराव पेशवे-२३, खून २४.

नारायणराव बक्षी नि. शिंदे १७६, २११, २६६.

नारायणराव वैद्य-२०६, २०९.

नारो महादेव भानू१.

नारो शंकर ( गंगाबाईचा मामा )—फितूर ५२.

नारोपंत चक्रदेव- नानातर्फे फितूर १८२, १८४, १८७, १९५, २०७ २१७, २३३, २५८, २६८.

नावलिनगाड्याची लढाई ३९.

निजाम-बारभाईस पाठिंबा देतो २५ ४८, पुणें दरबारास भेडसावून जहागीर उपटतो ४०, हैदराविरुद्ध मराठ्यांस सामील होतो ५५, ७० १०० इंग्रजांकडे फितूर होतो १०५, टिपूविरुद्ध मराठ्यांस सामील होतो ११७ १२६ शिंद्यांच्या साह्यानें पुण्यावर स्वारीचा प्रयत्न १५०, नाना व शिंदे यांच्या समेटामुळें निराशा १५२, खर्ड्यांची स्वारी व पराजय १५४-१६०. शिंद्यांविरुद्ध नानांस पाठिंबा देतो १६९-१७९, भाऊ व बाळोबा यांविरुद्ध नानांस साह्य देतो १८०-१८९, बाजीराव व शिंदे यांशीं कटकट १९२-१९६, २१४.

नीळकंठराव प्रभु १८४, १८६.

परशुरामभाऊ पटवर्धन ५३, ५५-५८, ६६-७१, ७०-८७, कर्नाटकांत स्वारी ९०, ९६, ९७, ९९, १०१-११०, इंग्रजांचे रसदेची लूट १०३, टिपूवर पहिली स्वारी ११७-१२६, टिपूवर दुसरी स्वारी-फौजेचें सेनापत्य १२६-१३५, १४४, १४६, १५२, खर्ड्याच्या स्वारींत सेनापत्य १५८--१५९, १६७-१७० बाजीरावाकडे फितूर होतात १७१-१७४, नानाविरुद्ध बाळोबाला सामील होतात १७५, चिमाजीचें दत्तविधान करून राज्यकारभार हातीं घेतात १७५-१७६, नानांस कैद करण्याचा प्रयत्न १७६--१७७, नानांविरुद्ध शत्रुत्व व कैद १७८--१८७, कैदेंतून सुटका २१२, २४२--२४३, नानांशीं पुनः सख्य २५१ २५७-२५८, मृत्यु २५९.

पांडुरंगराव गोविंद पटवर्धन ४६,५५.

पांडुरंगराव बारामतीकर ७१, ८५, ११०.

पांडुरंग कृष्ण सरअमीन १४८--१४९.

पानिपतचें युद्ध १०-११.

पार्वतीबाई पेशवे १२, तोतयाविषयीं

संशय ५१, ७१.
पुरंदरचा तह ४५.
फकीरजी गाडवे २०३–२०६,२०८, शिंद्यांचा दुय्यम कारभारी होतो २०९–२१४, कैद २१५.
फत्तेसिंग गायकवाड ३६, ३८, ४१, ६५, ९८.
बजाबा शिराळेकर १८६, १९४, १९७, २०६ २०७,२१५,२३३.
बजाबा पुरंदरे, ५१, ७१, ७३, ८५–८६.
बदामीचा वेढा १२३.
बळवंतराव नागनाथ १६५.
बळवंतराव मेहेंदळे मृ. १२.
बाहिरोपंत मेहेंदळे १७६. २३५.
बाजीराव (पहिले) पेशवे ६.
बाजीराव (दुसरे) पेशवे. जन्म ४०, ११०, १६१, १६३, पेशव्यांना गुप्त पत्रें पाठवितात १६५, नानांची दत्तकाची मसलत हाणून पाडतात १६७–१७३, पेशवेपदाची प्राप्ति १७४, बाळोबा व भाऊ यांच्या कारवाईमुळें पदच्युति व कैद १७५, नानांशीं सभेट १७९, कैदेंतून पळून जाण्याचा प्रयत्न १८३–१८४, सर्जेरावाच्या मध्यस्थीनें नानाविरुद्ध शिंद्यांशीं गुप्त करार १८५–१८६, नानांच्या कारस्थानामुळें पेशवेपदाची प्राप्ति १९१, नानाविषयीं भीति व द्वेष १९२–१९५, बदफैली वर्तन १९८–१९९, शिंद्यांकडून नानांस कैद करवितात २०२–२०६, २०९–२१५,नानांची पायधरणी करतात २१६–२१७, शिंदेबायांस चिथावून देतात २५०,२५१–२६५, २६६–२६९.
बाजीराव मोरेश्वर १४७–१४८.
बाजीपंतअण्णा जोशी ६९–७१,७७, १०१–११०, १२२.
बाणाजी शंख्या हुजऱ्या २०३–२०६, २६६.
बापू होळकर ११९.
बाबा फडके १६६, नानातर्फे फितूर १८२, १८४, २०७, २६८.
बाबूराव आपटे २१२.
बाबूराव वैद्य २३५.
बाबूराव रामचंद्र फडनवीस ६, ८,१०, पेशवाईचे मुख्य कारभारी १९–२०.
बाबूराव हरि गुप्ते-२४४–२४५.
बायजाबाई शिंदे १८५, दौलतरावाशीं लग्न २०८, २६१.
बाळाजी विश्वनाथ पेशवे१- ४,मृ.५.
बाळाजीपंत दामले ७१, ८६.
बाळाजी महादेव भानू १–४ मृ. ५.
बाळाजी माधव फडनवीस २७१.
बाळाजी कुंजर १७९, २०३. २०९.
बाळोबातात्या पागनीस१६७, १६८, नानाविरुद्ध उद्दाम बल्गना १६९–१७७, भाऊंस मिळून नानांचें उच्चाटण करतात १७७–१८६, कैद १८७, कैदेंतून सुटका व नानांशीं पुनः

सख्य २५७-२५८, नानातर्फे बाजीरावास धमकी देतात २६०, २६१.
बिंबोजी भोसले-९८.
बुराणुद्दिन नि. टिपू ११९-१२०, १२३-१२४.
भाऊ कापशे २१०.
भिवराव पानशे ५३, ८४, ९२.
मल्हारराव होळकर ( दुसरे ) १३१, १९७ शिंद्यांचा छापा व खून २००.
मशीरुल्मुल्क नि० निजाम १५०, मराठ्यांशीं द्वेष व चढेलपणा १५४-१५८, पेशव्यांच्या कैदेंत पडतो १५९-१६०. नानातर्फे भाऊ व बाळोबा यांस फसवितो १८२-१८९, १९१-१९६.
महादजी शिंदे-पुणें दरबारशीं लपंडाव २९-४६, स्वार्थी धोरण २९-३०, हरिपंतास हिसके देतात ३१-३५, पेशव्यांची भेट ४६-४७, नानाशीं सख्य ४९, ५३, करवीरकरांवर मोहीम ५८-५९, ६६, ७१, ७७-८७, ९०, इंग्रजांविरुद्ध मोहीम ९१-९४, बापूस कैद करतात ९५-९६, नानाशीं धुसफूस ९९-१००, १०१-११०, दिल्लीची दौलत ताब्यांत घेतात १३६-१४२, होळकर व अलीबहादर यांशीं भयंकर विग्रह १३७-१४१, नानांवर राग व दक्षिणेंत आगमन १४२, राज्यकारभारांत ढवळाढवळ, निजामाशीं मिलाफ व नानांची उघड निंदा १४३-१५२, होळकरांचा नाश करतात १५१, नानाशीं समेट व मृत्यु १५२, २४२-२४३.
महादाजी कृष्ण भानू १.
महंमद बेग हमदानी १३७.
महंमदअली कुमदान नि० हैदर ५५.
महंमद इसफ गारदी ९४.
माधवराव पेशवे १९-२१, मृत्यु २२.
माधवराव रास्ते १८७, २१२.
माधवराव जाधवराव २३५.
माधवराव बल्लाळ फडनवीस २६९-२७०.
मानाजी फाकडे ३६, फितूर ५७, ७९, १८३-१८९, २४४.
मालोजी राजे घोरपडे ३९, १८४, १८६.
मुकीरसाहेब नि. शिंदे- दगाबाजी २०४-२०६.
मुधोजी भोसले-साबाजीशीं तंटा २६, ४०, ७०, ९८, १०० इंग्रजांकडे फितूर १०५, १२२, १५७.
मुरारराव घोरपडे-अचाट शौर्य ५४.
मुशाफरखान पठाण नि. शिंदे २११.
मुसा रेमू नि. निजाम १५८ १५९, १९६.
मोरोबादादा फडनवीस ८, १०, फितूर १३, ४८, ५१, नानाविरुद्ध कारस्थान स्वरूप ६७-६८, उत्कर्ष ६८-

७०, राज्याधिकार हातीं घेतात ७१-७३, नानांचा पाणउतारा करतात ७७, शिंदे फडके पटवर्धन यांविरुद्ध कारस्थानें ७७-७९, इंग्रजांना आणण्याची मसलत ८०-८३, कारस्थानाचा शेवट व कैद ८४-८७, पुनः फितूर ८९, १४६, त्रागा व संन्यास १९७.
यशवंतराव होळकर १९७, २००, २६४, २६७.
यशवंतराव शिवाजी नि. शिंदे २११.
यशवंतराव माने म्हसवडकर ५७.
यशोदाबाई पेशवे १६७-१७५.
यशोदाबाई फडनवीस १०, १५.
यादगीरची भेट ११८.
यादवराव भास्कर नि. शिंदे २६३.
रखमाबाई फडनवीस ७, १२, मृ. १६
रघुनाथराव पेशवे १९, पुतण्याची कैद २०-२४ पेशवाईची प्राप्ति २५, पदच्युति व बंडावा २९,३६, इंग्रजांचा आश्रय घेतात ३७-९३ पेशव्यांच्या स्वाधीन होतात ९४, झाशीकडे रवानगी ९५, हरी बाबाजीवर छापा व पुनः इंग्रजांकडे पलायन ९७,१०९, पुनः पेशव्यांच्या स्वाधीन होतात-दुखणें व मृत्यु ११०.
रघुनाथराव कोल्हटकर--फितूर ५२.
रघोजी आंग्रे ५३.
रघुपतराव राजेबहाद्दर ६५, ६८, ७१, ८६.
रघोजी भोसले (दुसरे.) १६५, भाऊ व बाळोबा यांविरुद्ध नानांस पाठिंबा देतात १८०-१८९, बाजीराव व शिंदे यांशीं कटकट १९१-१९६,२१४.
रंगराव राजेबहाद्दर १३१.
रमाबाई पेशवे २१.
राघोपंत पेंडसे २१०.
राघो विश्वनाथ गोडबोले १९९,२१०, २३३.
राणोजी नाईक निंबाळकर ८९.
रामजी पाटील नि. शिंदे १७१,१७९.
रामचंद्र परशराम पटवर्धन २५९,२६३.
रामाजी महादेव भानू १-४ मृ० ५.
रामशास्त्री २२१,२३६.
रामचंद्र गणेश कानडे ५८,७७,१०२.
रामचंद्र नाईक परांजपे -फितूर ५२, कैद ५३.
रायाजी पाटील नि. शिंदे १७९,१८०.
राक्षसीचा छापा ५७.
रेझासाहेब बांकी नबाब नि. टिपू १३४
लक्ष्मीबाई शिंदे २००,२११,२१५, २४९,२५७,२६६.
लखबा लाड नि. शिंदे १६८,२६६.
लाखेरीची लढाई १५१.
लालसोटची लढाई--१३७.
लॉर्ड कॉर्नवॉलिस १३०-१३५.
वडगांवचा तह ९४.
वाघापूरची लढाई ९७.
वॉरन् हेस्टिंग्स् ४१; १०८.
विठोजी होळकर १९७,२००.

विनायक अमृत पेशवे २५८, २६०.
विसाजी कृष्ण बिनीवाले ६६, ७१, ८५, ८६,
वेंकटराव घोरपडे इचलकरंजीकर फितूर व दंड ५२, ९३.
वेंकटराव भावे नरगुंदकर १२०.
शंकराजी नारायण पंतसचिव १४७, १४९.
शृंगेरी मठाची लूट १२९..
शिवाजीपंत बाडदेकर ४३,४४,६९, ९२, ९३.
शिवराव घोरपडे गुत्तीकर ५५.
शिवरामपंत थत्ते २५१.
सखाराम हरि गुप्ते ३६,२४४,२४५.
सखारामबापू बोकील १९, २३, बारभाईंची उठावणी व मुख्याधिकाराची प्राप्ति २५-६३, नानांशीं वितुष्ट, मत्सरी स्वभाव, स्वार्थी धोरण, 'देवाचें'चा तंटा ६३-६५, मोरोबाची उठावणी करतात ६७-८८, मोरोबास तोंडघशी पाडतात ८३, नानाशीं पुन: समेट ८८, नानाशीं धुसफूस ८९, फितूर, कैद व मृत्यु ९५-९६ २४२-२४३.
सदाशिव रामचंद्र शेणवी ३३, ३९, ६८, ७१, ८६, कैद ९४.
सदाशिव मल्हार नि. शिंदे १६८, १७५, १८७.
सदाशिवराव भाऊ पेशवे ६, ८, ९, ११, मृ. १३.
सवाई रावसाहेब पेशवे जन्म २९, शिक्षण स्वभाव वगैरे ११३-११६, वकील इ. मुतलखीचा स्वीकार १४५, शिंद्यांविरुद्ध नानांची बाजू सांवरतात १४५-१५०, खर्ड्यांच्या स्वारीवर निघतात १५४-१६०, बाजीरावाविषयीं स्नेह व गुप्तपत्रें १६४-१६५, नानाकडून कानउघाडणी १६५, आजार व मृत्यु १६६.
सर्जेराव घाटगे १८४, १८५, १८८, २०३-२०६ २०८, शिंद्यांचा मुख्य कारभारी होतो २०९, पुण्याची दैना करतो २१०, पाटीलबावांच्या स्त्रियांना मारझोड करतो २११. सातारच्या महाराजांस चिथावून देतो २१२; २१३-२१४.कैद २१५, कैदेंतून सुटून शिंदे बायांवर मारेकरी घालतो २६१, शेणव्यांची कत्तल करतो २६६.
संताजी भोसले ५.
सालबाईचा तह १०७-११०.
साबाजी भोसले २६-२८, मृ. ४०.
सावशीची लढाई ५५.
सुमेरसिंग गारदी ९४.
सुरापूरकर संस्थानिक ४८, ९६.
सेंट ल्युबिन ६१-६२.
हरीपंत भिडे घातकी नजरचूक ३९.
हरीपंत फडके २५, बारभाईचे सेनापति २८-४६, कर्नाटकांत स्वारी ५५-५८, ६६-७०, ७७-८७, ९०, दुय्यम कारभारीपणा ९६, शिंद्यांशीं

धुसफूस ९९-१००; इंग्रजांशीं लढाया १०१--११०, टिपूवर स्वारी ११७-१३५, शिंदे व नाना यांचा समेट करतात १५२, मृ. १५४. २३३, २४२-२४३.

हरि महादेव भानू १-३,मृ. ४.

हरि बाबाजी नि. शिंदे ९७.

हैदरअली--कर्नाटकांत दंगा ४०,४८, ५४,मराठ्यांवर छापा ५७,८८, मराठ्यांशीं मैत्री व इंग्रजांवर स्वारी १००--१०५, १०६, मृ.१०९.